R.No. MHAMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ८४

दि.१३ मार्च २०२६,वारः शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## शेतकरी मेळावा उत्साहात; आधुनिक शेती पद्धतींचे मार्गदर्शन

लातूर प्रतिनीधी :लातूर जिल्ह्यातील एरंडी सारोळा येथे ट्वेंटीवन ॲग्री प्रा. लि. आणि हिमालया वेलनेस कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला भव्य शेतकरी मेळावा उत्साहात आणि मोठ्या प्रतिसादात पार पडला. परिसरातील अनेक गावांमधून शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. आधुनिक शेती पद्धती, पर्यायी पिके आणि बाजारपेठेतील नवीन संधी याबाबत माहिती मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी या मेळाव्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.




कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते तुळशीच्या रोपाला पाणी अर्पण करून करण्यात आली. भारतीय संस्कृतीत तुळशीला औषधी तसेच पवित्र स्थान असल्याने पर्यावरणपूरक शेतीचा संदेश देण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी विजय देशमुख, डॉ. अतुल जाधव, डॉ. आनंद पवार आणि धनंजय राऊत हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत शेतीतील बदलत्या परिस्थितीत नवीन पिकांकडे वळण्याची गरज अधोरेखित केली.

मेळाव्यात तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना सुगंधी व औषधी वनस्पतींची लागवड, उत्पादन तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि बाजारपेठेतील संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पारंपरिक पिकांवर अवलंबून राहण्याऐवजी शेतकऱ्यांनी लेमनग्रास, अश्वगंधा, तुळस, सर्पगंधा, सतावरी यांसारख्या औषधी व सुगंधी पिकांची लागवड केल्यास कमी खर्चात अधिक उत्पादन आणि चांगले आर्थिक उत्पन्न मिळू शकते, असे तज्ज्ञांनी सांगितले.

तसेच या पिकांना औषधनिर्मिती कंपन्या, आयुर्वेदिक औषध उत्पादक, कॉस्मेटिक उद्योग तसेच सुगंधी तेल निर्मिती उद्योगात मोठ्या प्रमाणावर मागणी असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. योग्य नियोजन, तांत्रिक मार्गदर्शन आणि बाजारपेठेची माहिती मिळाल्यास शेतकऱ्यांना पारंपरिक शेतीपेक्षा अधिक नफा मिळवता येऊ शकतो, असे मत वक्त्यांनी व्यक्त केले.

या मेळाव्यात आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर यावरही विशेष भर देण्यात आला. ड्रिप सिंचन पद्धतीचा वापर, सेंद्रिय खतांचा योग्य वापर, माती परीक्षण, पीक व्यवस्थापन, तसेच थेट बाजारपेठेशी संपर्क ठेवण्याचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले. बदलत्या हवामान परिस्थितीत शाश्वत शेती कशी करावी याविषयीही मार्गदर्शन करण्यात आले.

मेळाव्यात उपस्थित शेतकऱ्यांनी तज्ज्ञांना विविध प्रश्न विचारून शेतीतील अडचणी, रोग व कीड नियंत्रण, उत्पादन वाढवण्याचे उपाय आणि बाजारपेठेतील संधी याबाबत मार्गदर्शन घेतले. तज्ज्ञांनी प्रत्यक्ष उदाहरणे देत शेतकऱ्यांच्या शंकांचे समाधान केले.

या प्रसंगी परिसरातील प्रगतिशील शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांच्या यशस्वी शेती प्रयोगांमुळे इतर शेतकऱ्यांना प्रेरणा मिळावी आणि नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याची प्रेरणा मिळावी हा या सत्काराचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिवन कहाटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन धनंजय राऊत यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी ट्वेंटीवन ॲग्री प्रा. लि. च्या कर्मचारी व आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले. शेतकऱ्यांना नवीन शेती पद्धतींची माहिती देणारा आणि शेतीत बदल घडवून आणण्याची प्रेरणा देणारा हा मेळावा अत्यंत उपयुक्त ठरल्याची भावना उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

## लातूर शहरातील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजनेसाठी पोलीस व महानगरपालिकेचा संयुक्त पुढाकार पायलट प्रोजेक्ट

लातूर :लातूर शहरात वाढत्या वाहनसंख्येमुळे प्रमुख चौकांमध्ये वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असून नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुटसुटीत, सुरक्षित व शिस्तबद्ध करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्हा पोलीस दलाने महानगरपालिका प्रशासन व इतर संबंधित विभागांच्या समन्वयाने वाहतूक कोंडीच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.



या अनुषंगाने पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ११ मार्च २०२६ रोजी लातूर महानगरपालिकेच्या मीटिंग हॉलमध्ये वाहतूक समस्येबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस महानगरपालिका आयुक्त सौ. मानसी मीना, महापौर सौ. जयश्री सोनकांबळे, उपमहापौर डॉ. स्नेहल उटगे, विरोधी पक्षनेते श्री. देविदास काळे,ठढज विनोद चव्हाण तसेच महानगरपालिका बांधकाम विभाग, आरटीओ कार्यालय, राज्य परिवहन विभाग, अतिक्रमण विभाग व इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान लातूर शहरातील प्रमुख चौकांमध्ये निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीची कारणे, अनियमित पार्किंग, अतिक्रमण, चौकांची रचना, वाहतुकीचा वाढता ताण तसेच वाहतूक व्यवस्थापनातील अडचणी याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी काही प्रमुख चौकांवर पायलट प्रोजेक्ट राबवून सुधारित वाहतूक नियोजनाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक १२ मार्च २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता पोलीस व महानगरपालिका प्रशासनाच्या संयुक्त पथकाने पीव्हीआर चौक व छत्रपती शिवाजी चौक येथे प्रत्यक्ष भेट देऊन वाहतूक व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी चौकातील वाहतुकीचा प्रवाह, वाहनांची गर्दी होण्याची कारणे, रस्त्यांची रचना, अतिक्रमण, पार्किंग व्यवस्था तसेच सिग्नल व्यवस्थेची आवश्यकता याबाबत सविस्तर निरीक्षण करण्यात आले.

या पाहणीदरम्यान संबंधित विभागांना आवश्यक त्या सुधारणा तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून आजपासूनच पायलट प्रोजेक्टच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीस प्रारंभ करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत चौकांचे सुयोग्य नियोजन, वाहतूक प्रवाह सुलभ करणे, अतिक्रमणावर नियंत्रण, योग्य पार्किंग व्यवस्था तसेच वाहतुकीचा सुरळीत व सुरक्षित प्रवाह निर्माण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत.

लातूर जिल्हा पोलीस दल शहरातील वाढत्या वाहतूक समस्येबाबत अत्यंत गांभीर्याने विचार करत असून महानगरपालिका व इतर संबंधित विभागांच्या समन्वयातून लातूर शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक शिस्तबद्ध व सुटसुटीत करण्यासाठी कटिबद्ध आहे.

या प्रत्यक्ष पाहणीवेळी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, महानगरपालिका आयुक्त सौ. मानसी मीना, महापौर सौ. जयश्री सोनकांबळे, उपमहापौर डॉ. स्नेहल उटगे, विरोधी पक्षनेते श्री. देविदास काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) श्री. समीर सिंह साळवे, वाहतूक शाखेचे प्रभारी श्री. मनोज जिरगे तसेच महानगरपालिका व इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

लातूर शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत राहण्यासाठी नागरिकांनी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने करण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे तात्काळ निराकरण करावे; अन्यथा मुंबई मंत्रालयावर विद्यार्थी परिषदेकडून मोर्चा धडकणार : प्रदेश मंत्री डॉ. वरुणराज नन्नावरे

लातूर : विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, लातूर यांच्या वतीने काढण्यात आलेला विद्यार्थी आक्रोश मोर्चा उत्साहात पार पडला. या आंदोलनावेळी शेकडो विद्यार्थी कार्यकर्ते उपस्थित होते. मोर्चादरम्यान विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, प्रशासकीय व सुरक्षेसंबंधी अनेक मुद्दे उपस्थित करण्यात आले.यावेळी वक्त्यांनी आयटीआयमधील विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल विषयांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा अनेक ठिकाणी उपलब्ध नसल्याची खंत व्यक्त केली. तसेच आयटीआय विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या भत्त्यात होत असलेल्या अनियमिततेमुळे विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे सांगितले. या संदर्भात कौशल्य विकास मंत्री व संबंधित अधिकाऱ्यांना प्रश्न उपस्थित करण्यात आले.




जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची अनेक वर्षांपासूनची जिल्हा रुग्णालयासंदर्भातील मागणी अद्याप पूर्ण झालेली नसल्याबाबतही नाराजी व्यक्त करण्यात आली. आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.मोफत शिक्षणाच्या घोषणा केल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना शिक्षण व ट्युशनची फी भरावी लागत असल्याचे सांगत या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली. तसेच एमपीएससी व यूपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांच्या वेळापत्रकातील वारंवार होणारे बदल आणि परीक्षांमध्ये निर्माण होणाऱ्या अडचणींबाबतही विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली.

याशिवाय महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. काही ठिकाणी विद्यार्थी महाविद्यालयात गेल्यानंतर शिकवण्यासाठी प्राध्यापकच उपलब्ध नसल्याची परिस्थिती असल्याचे सांगण्यात आले.लातूर शहरात शैक्षणिक परिसरात वाढत असलेल्या गुन्हेगारीबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

विद्यार्थी परिषदेकडून विविध प्रश्नांबाबत जिल्हाधिकारी, संबंधित अधिकारी तसेच पोलिस प्रशासनाला वारंवार निवेदने देण्यात आली असूनही त्यावर ठोस कार्यवाही होत नसल्याची टीका यावेळी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या मागण्या तात्काळ पूर्ण न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला.

या वेळी मंचावर देवगिरी प्रांत प्रदेश मंत्री डॉ. वरुणराज नन्नावरे, लातूर जिल्हा संयोजक यश आरिकर, विशाल परिहार, ऋतुजा अट्टल, लक्ष्मी गोडबोले, गौरव पाटील, निकिता बिरादार आदी उपस्थित होते. मोर्चा प्रमुख म्हणून प्रतीक बारबोले यांनी काम पाहिले.

## महाबोधी महाविहार ब्राह्मण मुक्त झालेच पाहिजे..!

मुंबई प्रतिनिधी / के.एच. हनवते :- ऑल इंडिया बुद्धिस्ट फोरम आणि ऑल बुद्धिस्ट ऑर्गनायझेशन च्या वतीने (बिहार) बुद्ध गया येथील महाबोधी महाविहार संदर्भात एक दिवशीय देशव्यापी धरणा प्रदर्शन आंदोलन करण्यात आले, त्यानुसार आझाद मैदान मुंबई येथे गेल्या १० मार्च २०२६ रोजी भंतेजीं सह बौद्ध - आंबेडकर अनुयायी यांनी शेकडोंच्या संख्येने उपस्थित राहुन सारा आझाद मैदान परिसर घोषणेने दणाणून सोडला रद्द करा रद्द करा, बि.टी. ॲक्ट १९४९ चा कायदा रद्द करा..! बुद्धत्व हा आमचा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो आम्ही मिळवणारच..! महाबोधी महाविहार; हे आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे..! इत्यादी घोषणेने सारा परिसर दणाणून गेला, आणि म्हणून बुद्धगया येथील बिहार सरकार तसेच केंद्र सरकार यांनी महाबोधी महाविहार अता ब्राह्मण मुक्त केलेच पाहिजे, आणि ते आम्ही ब्राह्मण मुक्त केल्याशिवाय गप्प बसणार नाही..! हाच सर्व उपस्थितांनी संकल्प पूर्व निर्धार केला.



महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय...

# खरंच केंद्रस्तरीय आठवडी शिक्षण परिषदामुळे गुणवत्ता विकास होईल ?

आजपर्यंत आपण आठवडी बाजार शब्द ऐकत आलेलो आहोत . आठवड्यातून एकदा केंद्रस्तरीय शिक्षण परिषद आयोजित करण्याचे पत्र पडल्यापासून डोक्यात अनेक विचारांचे काहूर मातले आहे .आज पर्यंत आपण महिन्यातून एक दिवस केंद्रांतर्गत घटक शाळांमधील सर्व शिक्षक एकत्र येऊन प्रशासनामार्फत दिलेल्या विषयावर चर्चा होऊन पुढे काय करता येईल याबाबतचे नियोजन केले जात होते .गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टिकोनातून विचार विनिमय विविध शैक्षणिक साधनांचा वापर नियोजन याबाबत अपेक्षित होते .

आज खरच मासिक शिक्षण परिषदेची आवश्यकता आहे काय ?याचे नीट कुठलाही पूर्वग्रह न ठेवता विचार केला तर उत्तर येईल, नाहीच .मग आठवड्यातून एक दिवस म्हणजेच महिन्यातील चार दिवस विद्यार्थ्यापासून त्यांच्या अध्ययन–अध्यापनापासून शिक्षकांना दूर नेणे कशासाठी तर गुणवत्ता वाढीसाठी, एकत्र येऊन चर्चा करण्यासाठी, त्यांना निपुण करण्यासाठी, केवळ चर्चा करून गुणवत्ता वाढत नाहीत तर त्यासाठी शिक्षकांना विद्यार्थ्यासोबत जास्तीत जास्त कसा वेळ मिळेल याचा विचार करून शासन प्रशासनाने तज्ञ विचारवंताने लादत असलेले विविध प्रकारचे प्रशिक्षणे शिक्षण परिषदा रद्द केल्या पाहिजेत .

शासन प्रशासनाला वाटते की काळानुसार नवीन बदलानुसार शैक्षणिक आव्हाने स्विकारण्यासाठी , विद्यार्थी सक्षम बनवण्यासाठी शिक्षकांच्या व्यवसायिक कौशल्यात भर पडून त्यांचा कौशल विकास होऊन शिक्षक समृद्ध झाले पाहिजेत पण खरंच काळानुसार जर म्हणत असाल तर ऑनलाईन पद्धतीने शिक्षकांच्या उपलब्ध वेळेनुसार प्रशिक्षणे शासनाच्या शैक्षणिक वेबसाईट वरून उपलब्ध केली पाहिजेत व ती प्रशिक्षणे घेण्याचे सुचित केल्यास योग्यच होईल यात मुळीच चुकीचे नाही असे मला तरी एक विद्यार्थी हितचिंतक शिक्षक म्हणून वाटल्यास त्यात नवल नाही .

आज आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा जमाना आहे त्यासाठी विविध तंत्रज्ञानाच्या संगणकाच्या मोबाईलच्या माध्यमातून प्रशिक्षण आयोजित करायचे तिकडेच गेले पारंपरिक व वेळ खाऊ पद्धतीची प्रशिक्षणे, परिषदा घेऊन ईप्सित ध्येय साध्य होतील काय ?

गुणवत्ता वाढीच्या नावाखाली शासनाकडून वर्षभरात विविध उपक्रम लावले जातात .दरवर्षी नवनवीन प्रयोग केले जातात विविध सप्ताह त्यातील उपक्रम फोटो अपलोड अहवाल सादर महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथी साजरा करणे असे अनेक उपक्रम केले जातात . राष्ट्रीय सणाच्याअनुषंगाने २६ जानेवारी १५ ऑगस्ट या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा घेतल्या जातात मग राहिलेल्या वेळातून विद्यार्थ्यांना शिकवणे व संपूर्ण गुणवत्ता वाढविणे यासाठी शिक्षकांना कसरत करावी लागते .

जो शिक्षक तळागाळात वाडी तांड्यावर गुणवत्ता वाढवण्यासाठी , शाळेची पटसंख्या टिकवण्यासाठी, वाढवण्यासाठी शाळा टिकविण्यासाठी पदरमोड पैसा खर्च करून विविध संस्थांच्या स्पर्धेत भव्य दिव्य स्नेहसंमेलने शाळेत आयोजित केली जात आहेत . त्यासाठीचा दिला गेलेला सरावासाठीचा वेळ भरून काढण्यासाठी , निपून भारत अंतर्गत शासनाने दिलेल्या कालावधीत विद्यार्थी गुणवत्ताधारक बनवण्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थी प्रयत्नांची पराकाष्ठा करित आहेत . मग दर शनिवारी शिक्षण परिषद घेऊन काय साध्य होणार आहे . शिक्षण परिषदेशिवाय विविध माध्यमांच्या द्वारे माहिती दिली तर निश्चितच फायदा होईल म्हणून प्रशासनाने याचा विचार करून विद्यार्थ्यापासून दूर नेणाऱ्या परिषदा रद्द कराव्यात ही सर्वसामान्य शिक्षकांची विनंती आहे .

# अमेरिकाइराण संघर्षामुळे कच्च्या तेलाचा भडका; तुमच्या खिशाला झळ बसणार का?

जगातील राजकारणात एखाद्या ठिणगीचा ज्वालामुखी व्हायला फार वेळ लागत नाही. मध्यपूर्वेतील राजकारण हे तर कायमच बारूदाच्या ढिगाऱ्यावर उभे असते. अशाच परिस्थितीत पुन्हा एकदा अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव तीव्र झाला आहे आणि त्याचा सर्वात मोठा परिणाम जगभरातील अर्थव्यवस्थेवर, विशेषतः कच्च्या तेलाच्या किंमतींवर होताना दिसत आहे. कच्च्या तेलाच्या दराने घेतलेली उसळी ही केवळ आंतरराष्ट्रीय बाजारातील आकड्यांची गोष्ट नाही; ती थेट सर्वसामान्यांच्या खिशाशी, त्यांच्या रोजच्या आयुष्याशी आणि देशाच्या अर्थकारणाशी जोडलेली आहे. आज पेट्रोल पंपावर उभ्या असलेल्या सामान्य नागरिकाच्या मनात एकच प्रश्न घोंगावत आहे की, जगाच्या राजकारणात होणाऱ्या संघर्षाची किंमत आम्हालाच का मोजावी लागते?



जगातील बहुतेक कच्चे तेल मध्यपूर्वे तून येते. इराण, सौदी अरेबिया, इराक, कुवेत, संयुक्त अरब अमिराती हे देश तेलसंपन्न आहेत. त्यामुळे या प्रदेशातील राजकीय तणावाचा थेट परिणाम जागतिक तेल बाजारावर होतो. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष हा नवीन नाही. गेल्या अनेक दशकांपासून या दोन देशांमध्ये वैचारिक, राजकीय आणि लष्करी संघर्ष सुरू आहे. अणुकरार, निर्बंध, आर्थिक दबाव आणि लष्करी कारवाया या सगळ्या गोष्टींमुळे या प्रदेशातील वातावरण सतत तणावपूर्ण राहिले आहे. जेव्हा या संघर्षाची तीव्रता वाढते, तेव्हा तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती निर्माण होते. बाजारात भीती निर्माण झाली की व्यापारी मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी करतात आणि त्याचा परिणाम म्हणून कच्च्या तेलाच्या किंमती अचानक वाढतात. ही वाढ केवळ व्यापाऱ्यांच्या आकड्यांमध्ये दिसत नाही; ती प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत धक्के निर्माण करते. भारत हा जगातील सर्वात मोठ्या तेल आयात करणाऱ्या देशांपैकी एक आहे. आपल्या देशातील जवळपास ८५ टक्के कच्चे तेल परदेशातून आयात केले जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत वाढली की त्याचा थेट परिणाम भारतावर होतो.

कच्च्या तेलाचे दर वाढले की पेट्रोल, डिझेल, एलपीजी गॅस, विमान इंधन यांचे दर वाढतात आणि त्यानंतर सुरू होते महागाईची साखळी प्रतिक्रिया. डिझेल महाग झाले की वाहतूक खर्च वाढतो. वाहतूक खर्च वाढला की भाजीपाला, धान्य, फळे, दूध, बांधकाम साहित्य अशा सर्व वस्तूंच्या किंमती वाढतात. शेवटी याचा सर्वात मोठा फटका बसतो तो सामान्य मध्यमवर्गीय आणि गरीब नागरिकांना. महागाई ही एक अशी आग आहे जी दिसत नाही, पण ती हळूहळू सर्वसामान्यांचे आयुष्य जाळत जाते. आज आधीच महागाईचा ताण वाढलेला आहे. घरभाडे वाढले आहे, शिक्षण महाग झाले आहे, आरोग्यसेवा खर्चिक झाली आहे. त्यात जर इंधनाच्या दरात वाढ झाली तर ती सामान्य माणसाच्या बजेटला अक्षरशः हादरवून टाकते. एका सामान्य कुटुंबाचा विचार करा. घरात नोकरी करणारा एक व्यक्ती आहे. महिन्याचे ठरलेले उत्पन्न आहे. घरभाडे, मुलांचे शिक्षण, वीजबिल, किराणा, औषधे सगळे खर्च ठरलेले आहेत.

जर पेट्रोल १०१५ रुपये वाढले तर त्याचा परिणाम केवळ वाहन चालवण्यापुरता मर्यादित राहत नाही. तो संपूर्ण घरखर्चावर परिणाम करतो. मग सुरू होते तडजोडीचे आयुष्य. कधी मुलांच्या शिक्षणात काटकसर, कधी आरोग्यावर तडजोड, कधी स्वतः च्या छोट्या आनंदांवर पाणी. जगातील महासत्तांच्या राजकारणाची किंमत अशा प्रकारे सामान्य नागरिक भरत असतो. तेल म्हणजे केवळ वाहन चालवण्यासाठीचे इंधन नाही. आजच्या आधुनिक अर्थव्यवस्थेचा तो कणा आहे. औद्योगिक उत्पादन, वाहतूक व्यवस्था, शेती, विमान सेवा, रासायनिक उद्योग या सगळ्यांचे जीवन तेलावर अवलंबून आहे. तेल महाग झाले की उत्पादन खर्च वाढतो. उत्पादन खर्च वाढला की वस्तू महाग होतात. म्हणजेच कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ म्हणजे संपूर्ण अर्थव्यवस्थेवर पडणारा आर्थिक भूकंप.

जगातील राजकारण अनेकदा शक्तीच्या खेळावर आधारित असते. महासत्ता आपले वर्चस्व टिकवण्यासाठी आर्थिक निर्बंध, लष्करी दबाव आणि राजनैतिक खेळी करत असतात. परंतु या सगळ्या खेळात सर्वात मोठे बळी ठरतात ते सामान्य नागरिक. इराणवर निर्बंध घालणे, तेलाच्या निर्यातीवर मर्यादा आणणे किंवा लष्करी तणाव वाढवणे, या सगळ्यांचा परिणाम थेट तेलाच्या पुरवठ्यावर होतो आणि त्यानंतर सुरू होते जागतिक बाजारातील किंमतींची स्पर्धा. तेलाचे दर वाढतात आणि त्याची झळ जगातील प्रत्येक देशाला बसते. या परिस्थितीत भारतासमोर मोठा प्रश्न उभा राहतो, आपण या संकटातून कसे बाहेर पडणार? कच्च्या तेलावर अवलंबित्व कमी करणे हा दीर्घकालीन उपाय आहे. सौरऊर्जा, पवनऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने, जैवइंधन यांसारख्या पर्यायी ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवणे आवश्यक आहे. सरकारने गेल्या काही वर्षांत इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अजूनही देशात पेट्रोल आणि डिझेलवर चालणाऱ्या वाहनांची संख्या प्रचंड आहे. ऊर्जा स्वावलंबनाचा मार्ग सोपा नाही, पण तो आवश्यक आहे.

अशा वेळी सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. इंधनावरील कर कमी करणे, पर्यायी ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देणे, सार्वजनिक वाहतूक मजबूत करणे या सर्व गोष्टींचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. कारण महागाईचा सर्वात मोठा फटका बसतो तो सामान्य नागरिकांना. सरकारचे अर्थकारण आणि नागरिकांचे जगणे यामध्ये समतोल साधणे ही मोठी जबाबदारी आहे.

आज जगाला सर्वात जास्त गरज आहे ती शांततेची. युद्ध, संघर्ष आणि निर्बंध यामुळे कोणाचाही खरा फायदा होत नाही. त्यातून फक्त वाढते ते अस्थिरता, महागाई आणि आर्थिक संकट. जगातील महासत्तांनी आपल्या राजकीय आणि लष्करी स्वार्थापलीकडे जाऊन मानवतेचा विचार करण्याची वेळ आली आहे. कारण एका देशातील संघर्षाची झळ आज संपूर्ण जगाला बसते. आज पेट्रोल पंपावर उभा असलेला सामान्य भारतीय नागरिक कदाचित जागतिक राजकारण समजत नसावा. त्याला माहित नसते अणुकरार काय असतो, निर्बंध काय असतात, किंवा मध्यपूर्वेतील भू–राजकारण काय असते. पण त्याला एक गोष्ट नक्की समजते की, पेट्रोल महाग झाले की त्याचे आयुष्य कठीण होते. अमेरिकाइराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या किंमती पुन्हा वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. जर ही परिस्थिती नियंत्रणात आली नाही, तर त्याचा थेट परिणाम भारतासह अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहे. जगातील राजकारणातील संघर्षांची किंमत शेवटी सामान्य नागरिकालाच मोजावी लागते, ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच आजचा खरा प्रश्न असा आहे की, जगातील महासत्ता आपले राजकारण थांबवतील का, की सामान्य नागरिकांच्या खिशाला पुन्हा एकदा झळ बसणार आहे? कारण कच्च्या तेलाच्या भडक्याची आग शेवटी पेट्रोल पंपावर नव्हे, तर सामान्य माणसाच्या जीवनात पेटते.

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा विभागामार्फत राज्यभर नियंत्रण कक्ष; जिल्हास्तरीय समित्या स्थापन

मुंबई, : इराण–इस्रायल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठ्याबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत.घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन– घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सर्व सरकारी गॅस कंपन्यांचे अधिकारी यांचा या समित्यांमध्ये समावेश असेल. गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणे ही समित्यांची प्रमुख जबाबदारी असेल.मुंबई–ठाणे रेशनिंग क्षेत्रात नियंत्रक, रेशनिंग यांच्या नियंत्रणाखाली स्थापन केलेल्या समितीत पोलीस उप आयुक्त आणि उपनियंत्रक (रेशनिंग) समितीत समावेश करण्यात येणार असून मुंबई आणि ठाणे शहरातील सर्व उपायुक्तांशी सह पोलीस आयुक्त (प्रशासन) समन्वय साधणार आहेत.पर्यायी इंधनाच्या वापराची शक्यता तपासण्याचे निर्दे शही यंत्रणांना देण्यात आले आहेत. यामध्ये कोळसा, रॉकेल आदी पर्यायांचा विचार केला जाणार असला तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच जिल्हास्तरीय समित्यांनी हॉटेल व रेस्टॉरंट संघटनांसोबत बैठक घेऊन पर्यायी इंधनाच्या वापरासाठी प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहेत.अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने–रुग्णालये, शासकीय वसतिगृहे, शासकीय शाळा/महाविद्यालयांमधील मेस, मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा आदी अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्थांना घरगुती/व्यावसायिक गॅसचा पुरवठा प्राधान्याने देण्यात येणार असून अशा संस्थांची यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने देण्यासाठी स्वतंत्र प्राधान्यक्रमही निश्चित केला जाणार आहे.

गॅस पुरवठ्याबाबत अफवा पसरू नयेत, यासाठी दररोज रेडिओ, एफएम, दूरदर्शन तसेच मुद्रित माध्यमांद्वारे माहिती देण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि जिल्हा समित्या यांसंदर्भातील जबाबदारी पार पाडतील समाज माध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवरही कारवाई करण्यात येणार आहे.गॅस बुकींग ॲप आणि मिस्ड कॉल सेवांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याचे निर्दे श तेल कंपन्यांना देण्यात आले आहेत. तसेच राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष तातडीने सुरू करून तक्रार निवारणासाठी व्हॉट्सअ‍ॅप सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.आगामी धार्मिक सण व उत्सवांचा विचार करून सार्वजनिक संस्थांना एलपीजी सिलिंडरचा पुरवठा अखंड ठेवण्यासाठी प्राधान्य राहील.गॅस सिलिंडर पुरवठ्या संदर्भात नागरिकांमध्ये घबराट निर्माण होऊ नये, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत सदस्यांची मदत घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. एलपीजी वाहतूक करणाऱ्या वाहनांना तसेच गॅस एजन्सींना आवश्यक पोलीस संरक्षण देण्याची जबाबदारी पोलिस प्रशासनावर सोपविण्यात आली आहे.

जिल्हा प्रशासन, रेशनिंग नियंत्रक आणि तेल कंपन्यांनी दररोज साठा स्थिती व अद्ययावत अहवाल राज्यस्तरीय नियंत्रण कक्षाला सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही– महाराष्ट्र राज्यात दररोज सरासरी सुमारे ९,००० मेट्रिक टन एलपीजी ची मागणी असते. ही मागणी पूर्ण करण्यासाठी रिफायनरीमधील एलपीजी उत्पादन वाढविण्यात आले असून, गेल्या दोन दिवसांत दैनिक उत्पादन ९,००० मेट्रिक टनांवरून ११,००० मेट्रिक टनांपर्यंत वाढविण्यात आले आहे. त्यामुळे राज्यात घरगुती एलपीजीचा कोणताही तुटवडा नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. घरगुती गॅसची मागणी पूर्ण करण्याइतके पुरेसे उत्पादन आणि साठा उपलब्ध आहे.

व्यावसायिक एलपीजीच्या बाबतीत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार रुग्णालये, शाळांमधील मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा, सामुदायिक स्वयंपाकगृहे (कम्युनिटी किचन), तसेच शासकीय शाळा व महाविद्यालयांच्या मेस यांसारख्या अत्यावश्यक सेवांना प्राधान्य देण्यात येत आहे. उपलब्ध उत्पादनातून या सर्व गरजा पूर्ण होऊ शकतात.

घरगुती वापरासाठीच्या पाइप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) चा देखील पुरेसा साठा उपलब्ध आहे. इंधनाच्या बाबतीतही राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. बाजारातील मागणी पूर्ण करण्यासाठी राज्यातील रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत असून दररोज सुमारे १५,००० किलो लिटर पेट्रोल आणि ३८,००० किलो लिटर डिझेल या मागणीची पूर्तता केली जात आहे. त्यामुळे इंधन पुरवठ्याबाबत नागरिकांनी काळजी करू नये असे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

# महागाईचा भडका! लातूरमध्ये गॅस दरवाढीविरोधात काँग्रेसची 'सिलेंडर अंत्ययात्रा' आणि भर रस्त्यात पेटवली चूल

लातूर / प्रतिनिधी :-केंद्र सरकारने घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात केलेल्या भरमसाठ वाढीने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. या दरवाढीचा निषेध करण्यासाठी आज लातूर शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शहरात अत्यंत आक्रमक आणि अनोखे आंदोलन करण्यात आले. काँग्रेस भवन ते महात्मा गांधी चौक या मार्गावर काँग्रेस कार्यकर्त्यांनी गॅस सिलेंडरची चक्क 'अंत्ययात्रा' काढून महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर केंद्र सरकारच्या धोरणांचा तीव्र निषेध नोंदवला.

सिलेंडरची तिरडी आणि सरकारचा निषेध-या आंदोलनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कार्यकर्त्यांनी गॅस सिलेंडरला फुलांचे हार घालून, त्याला बांबूच्या तिरडीवर बांधून त्याची अंत्ययात्रा काढली. महागाईने सामान्यांच्या स्वप्नांची राखरांगोळी केली असून, गॅस सिलेंडर आता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेला आहे, अशा भावना आंदोलकांनी व्यक्त केल्या. 'भाजप सरकारचे करायचे काय, खाली डोकं वर पाय' परत या परत या गॅस दर परत , अमर रहे अमर रहे गॅस सिलेंडर अमर रहे, या अशा घोषणांनी लातूरचा मुख्य बाजारपेठ परिसर दणाणून गेला होता.

रस्त्यावर पेटली चूल; गृहिणींचा संताप-आंदोलनादरम्यान केवळ घोषणाबाजी न करता, महिला कार्यकर्त्यांनी भर रस्त्यात लाकडाची चूल पेटवून त्यावर स्वयंपाक करण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. वाढत्या महागाईमुळे गॅस वापरणे अशक्य झाल्याने आता पुन्हा चुलीकडे वळण्याची वेळ आली आहे, हे यातून अधोरेखित करण्यात आले. एकदा गॅस देऊन फोटो काढणारे सरकार आता तोच गॅस भरण्यासाठी हजारो रुपये उकळत आहे, असा घणाघात यावेळी महिला पदाधिकाऱ्यांनी केला.



जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांचा आक्रमक पवित्रा आणि पुढील इशारा-या आंदोलनात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, देशातील प्रत्येक नागरिक आज महागाईने होरपळून निघाला आहे. २१ व्या शतकात जर लोकांना गॅससाठी रांगा लावाव्या लागत असतील, तर हे सरकारचे अपयश आहे. युपीए सरकारच्या काळात ४०० रुपयांना मिळणारा सिलेंडर आज १२८० रुपयांच्या पुढे गेला आहे. सरकारने ही दरवाढ तातडीने मागे घ्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.

ड.किरण जाधव यांचा सरकारवर घणाघात- लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड.किरण जाधव यांनी सरकारवर सडकून टीका केली. जाधव म्हणाले की, लाडकी बहीण' म्हणून योजना आणायची आणि दुसऱ्या बाजूला गॅसचे दर वाढवून त्यांच्या खिशातून पैसे काढून घ्यायचे, हे सरकारचे दुटप्पी धोरण आहे. काँग्रेसच्या काळात ४५० रुपयांना मिळणारा गॅस आज १२८० रुपयांवर गेला आहे. आज गॅस बुक केला तरी तो मिळेल की नाही, याची शाश्वती राहिलेली नाही. गॅसच्या या टंचाईमुळे आणि महागाईमुळे सर्वसामान्य जनता भयभीत झाली आहे. या महागाईने रोजगाराची समस्या निर्माण झाली आहे सुशिक्षित बेरोजगार तरुणांना पकोडे विक्रीचा उपदेश देणाऱ्या सरकारने आता त्यांना गटारीतून गॅस निर्मितीचे प्रशिक्षण द्यावे अशी मागणी केली .

हॉटेलमधील जेवणही महागले-जाधव यांनी पुढे नमूद केले की, गॅस दरवाढीचा फटका केवळ घरगुती बजेटलाच नाही, तर हॉटेल व्यवसायालाही बसला आहे. कमर्शियल गॅसच्या वाढत्या दरामुळे हॉटेलमधील जेवण महाग झाले असून, त्याचा अंतिम बोजा सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावरच पडत आहे. या महागाईच्या चक्रव्यूहात जनता अडकली असताना सरकार मात्र केवळ घोषणाबाजी करण्यात मग्न आहे.

यावेळी उपमहापौर ड. स्नेहल उटगे, महापालिकेतील काँग्रेसचे गटनेते विजयकुमार साबदे, सपना किसवे, तबस्सुम शेख, सचिन बंडापल्ले, फारुख शेख, अभिषेक पतंगे, मंगेश सोनकांबळे,पवन सोलंकर यांच्यासह अनेक नगरसेवक,महिला आघाडीच्या पदाधिकारी, विविध फ्रंटल सेलचे अध्यक्ष व शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आजच्या या आंदोलनामुळे महागाईने त्रस्त असलेल्या नागरिकांनी देखील या आंदोलनाला उत्स्फूर्त पाठिंबा दर्शवल्याचे पाहायला मिळाले.


# ग्रंथ दिंडी, प्रदर्शनप्रदर्शन ,परिसंवाद, कवी संमेलन ,कथाकथन, उत्कृष्ट वाचकांचा सत्कार आदि कार्यक्रमांची रेलचेल...

लातूर-महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग ग्रंथालय संचालनालय, मुंबई,लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या वतीने शनिवार दिनांक १४ मार्च व रविवार दिनांक १५ मार्च २०२६ रोजी औसा येथील श्री मुक्तेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, लातूर ग्रंथोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवसाच्या या ग्रंथोत्सवात ग्रंथदिंडी, ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ विक्री, विविध विषयांवरील परिसंवाद ,कवी संमेलन ,कथाकथन, उत्कृष्ट वाचकांचा सत्कार आणि समारोप असे उपक्रम राहणार असून या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन जिल्हाचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर देशमुख यांनी दिली.

शनिवार दिनांक १४ मार्च रोजी सकाळी८.३० ते सकाळी १०.३० या वेळात नाथ मंदिर ते श्री मुक्तेश्वर विद्यालय दरम्यान ग्रंथदिंडी निघणार आहे .तिचे उद्घाटन पंढरपूर विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज यांच्या हस्ते होईल. यावेळी मुक्तेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवलिंग शांतिवीर औटी, जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव, मुक्तेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य एस एम जलसगरे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

सकाळी ११ ते दुपारी १ या दरम्यान उद्घाटन सत्र होणार असून पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते ग्रंथोत्सव २०२५ चे उद्घाटन होईल. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे राहणार आहेत. याप्रसंगी आमदार विक्रम काळे ,लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर, खासदार डॉक्टर शिवाजी काळगे ,आमदार सतीश चव्हाण ,आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अमित देशमुख, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड , औसाच्या नगराध्यक्षा परविन शेख ,जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, राज्याचे प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, छत्रपती संभाजी नगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, इतिहास संशोधक प्राचार्य डॉक्टर सोमनाथ रोडे, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्य उपाध्यक्ष ग्रंथमित्र राम मेखले,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथ मित्र प्रभाकर कापसे ,मराठवाडा साहित्य परिषद लातूरचे अध्यक्ष योगराज माने यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

दुपारी २ ते ४ या वेळात सुमती जगताप यांच्या अध्यक्षतेखाली समाज विकासात महिलांचे योगदान या विषयावर परिसंवाद होणार




आहे. यामध्ये डॉक्टर कुसुमताई मोरे, जिल्हा परिषद सदस्य आशाताई भिसे या प्रमुख वक्त्या राहणार आहेत.

दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळात जेष्ठ कवयित्री वृषाली पाटील यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कवी संमेलन होईल. याचे सूत्रसंचालन कवी संजय घाडगे व कवी दयानंद बिराजदार हे करणार आहेत. यामध्ये कवी शंकर झुलपे, रमेश चिल्ले भारत सातपुते, राजेसाहेब कदम, अजय पांडे, नरसिंग इंगळे ,सतीश हाणेगावे, सुरेश गीर ,रामदास कांबळे, प्रकाश घादगीने,संजय जमदाडे जाहिरोदिन शेख, जाहीरोद्दीन सय्यद ,डॉक्टर दुष्यंत कठारे, प्रा गोविंद जाधव, राजेंद्र माळी, रंजना गायकवाड, अरविंद मलवाडे, शैलजा कारंडे, रजनी गिरवलकर ,जना घुले, वंदना केंद्रे ,स्वाती जोशी, रुचा पत्की, नम्रता धडे, प्रणिता चाकूरकर, नयन राजमाने ,उषा भोसले, विद्या बयास, डॉक्टर क्रांती मोरे, विमल मुद्दाळे, विजया भणगे , मंगल सास्तुरकर, तहसीन सय्यद, बालाजी मुंडे ,राजेंद्र कांबळे, डॉक्टर निलेश नागरगोजे, देवदत्त मुंडे, एडवोकेट हाशम पटेल, सुरेखा ऊसतुर्गे ,सविता धर्माधिकारी, सुलक्षणा सोनवणे, सुनिता मोरे, विश्वंभर इंगोले ,नामदेव कोद्रे, प्रदीप कांबळे ,शिवाजी गायकवाड, रमेश हनुमंते ,गोविंद गारकर, दिलीप लोभे ,सतेशीला कलशेट्टी, अंगद भुरे ,विशाल अंधारे ,छगन घोडके ,अनिल चवळे ,डॉक्टर चंद्रशेखर मलकमपट्टे, दत्तप्रसाद झंवर,शालिनी निलंगेकर, जया निलंगेकर ,कमलाकर सावंत भरत कांबळे ,रमेश विवेकी,

विश्वंभर वराट हे सहभागी होणार आहेत.

लातूर ग्रंथोत्सव २०२५ च्या दुसऱ्या रविवार दिनांक १५ मार्च २०२६ या दिवशी सकाळी १०.३० ते ११.३० या वेळात लेखिका सुनिता आरळीकर यांच्या अध्यक्षतेखाली ऐतिहासिक स्त्रिया: वारसा आणि कर्तृत्व या विषयावरील परिसंवाद होणार आहे, यात प्राचार्य मधुकर सलगरे डॉक्टर विवेक सौताडेकर , डॉक्टर अशोक नारनवरे हे विचार मांडणार आहेत.

सकाळी ११:३० ते दुपारी १ या वेळात ज्येष्ठ कथाकार जी. जी.कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथनाचा कार्यक्रम होणार आहे.यामध्ये अंबादास केदार व सतीश सुरवसे हे कथा सादर करतील.

दुपारी २ते ४ या वेळात प्राचार्य डॉक्टर संजय गवई यांच्या अध्यक्षतेखाली कृत्रिम बुद्धिमत्ता :वाचन संस्कृतीस आव्हान या विषयावरील परिसंवादात डॉक्टर संभाजी पाटील व डॉक्टर रत्नाकर बेडगे हे विचार व्यक्त करणार आहेत.

दुपारी ४ ते सायंकाळी ५.३० या दरम्यान उत्कृष्ट वाचक सत्कार आणि लातूर ग्रंथोत्सव २०२५ चा समारोप जेष्ठ साहित्यिक विचारवंत डॉक्टर नागोराव कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यात्प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मुक्तेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव रविशंकर मला चट्टे, औसाचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, लातूरचे शिक्षण उपसंचालक डॉक्टर दत्तात्रय मठपती, औसाचे तहसीलदार घनश्याम अडसूळ हे लाभणार आहेत..

दोन दिवस चालणाऱ्या या लातूर ग्रंथोत्सवात सकाळी १० ते रात्री८ या वेळात सर्वांसाठी ग्रंथ प्रदर्शन व विक्री खुली राहील, या ग्रंथोत्सवासाठी श्री मुक्तेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय औसा , श्री विकास वाचनालय औसा, कै रामदास नाईक सार्वजनिक वाचनालय औसा, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर वाचनालय औसा, शाह जमाल रसूल कादरी पब्लिक लायब्ररी औसा हे प्रयत्नशील आहेत, असे जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी सांगितले.

दरम्यान,लातूर जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळीतील पदाधिकारी, ग्रंथालय कर्मचारी, वाचक, साहित्य प्रेमींनी या लातूर ग्रंथोत्सव २०२५ ला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन लातूर ग्रंथोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष सुनील हुसे, सदस्य डॉक्टर दत्तात्रय मठपती, तानाजी घोलप ,ग्रंथ मित्र आत्माराम कांबळे, मसापचे लातूर जिल्हा अध्यक्ष योगीराज माने, ग्रंथमित्र प्रभाकर कापसे, सदस्य सचिव वंदना काटकर, तसेच पी.सी. पाटील, बाळ होळीकर, अनिल पाटील, धनंजय आप्पा कोपरे, कमलाकर सावंत, हावगीराव बेरकिले,डॉक्टर सुधीर गरड, श्रीधर स्वामी, शादुल शेख, सुधीर आचार्य, हिरालाल पाटील, सुधीर आचार्य, राजेंद्र कोरे यांनी केले आहे

# पीव्हीआर चौकाची होणार वाहतूक कोंडीतून सुटका ३१ मार्चची डेडलाईन

## मनपासह सर्व विभागांकडून प्रत्यक्ष पाहणी

लातूर/प्रतिनिधी : शहरातील समस्यांचा आढावा घेतला.



वाहतूक कोंडी कायमस्वरूपी दूर करून वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी मनपासह सर्व विभाग कामाला लागले आहेत. त्या अनुषंगाने महापौर,उपमहापौर, पोलीस अधिक्षक, आयुक्त व प्रमुख अधिकाऱ्यांनी गुरुवारी पीव्हीआर चौकाची पाहणी केली.आवश्यक त्या उपाययोजना करून ३१ मार्चपर्यंत पीव्हीआर चौक वाहतूक कोंडीमुक्त करण्याची डेडलाईन यावेळी ठरविण्यात आली.

लातूर शहरात वाहतूक समस्या गंभीर होत असल्याने बुधवारी मनपा कार्यालयात विविध विभागांची बैठक आयोजित करण्यात आली होती.त्या बैठकीत ठरल्यानुसार गुरुवारी सकाळी महापौर जयश्री सोनकांबळे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, मनपा आयुक्त श्रीमती मानसी ,उपमहापौर स्नेहल उटगे, सभागृह नेते विजयकुमार साबदे, विरोधी पक्षनेते देविदास काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी समिरसिंह साळवे, उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांच्यासह इतर अधिकारी पीव्हीआर चौकात उपस्थित राहून तेथील चौक परिसरात झालेली अनधिकृत अतिक्रमणे हटविणे,चौकात ५० मीटर अंतरापर्यंत नो पार्किंग झोन राबविणे,फ्री लेफ्ट टर्न संकल्पना अमलात आणणे, फेरीवाले व हातगाडे मुख्य रस्त्यावरून बाजूला करणे,सिग्नल यंत्रणा कार्यरत करणे या बाबी चौकातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आवश्यक असल्याचे पाहणी दरम्यान लक्षात आले.चौकात झेब्रा क्रॉसिंगच्या खुणा पुन्हा करण्याचेही निर्देश देण्यात आले.

या सर्व उपाययोजनांची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. पोलीस विभागानेही मनपाला सहकार्य करण्यास तत्पर असल्याचे सांगितले.

या सर्व बाबींचा विचार करता दिनांक ३१ मार्चपर्यंत पीव्हीआर चौकातील वाहतूक कोंडी दूर करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. पीव्हीआर चौकातील वाहतूक सुरळीत झाल्यानंतर शहरातील इतरही ठिकाणी याच पद्धतीने अंमलबजावणी केली जाणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांचा जाहीर सत्कार व पहिलीच पत्रकार परिषद

मुंबई प्रतिनिधी / के. एच. हनवते :-



मराठी पत्रकार संघ मुंबई, पत्रकार भवन (सिएसटी) मुंबई येथे मीडिया लिंक अँड इव्हेंट मॅनेजमेंट यांच्यातर्फे प्रथम:तह: नुकते राज्यसभेवर निवड झालेले खासदार : श्री रामराव वडकुते (राज्यसभा सदस्य, भारत सरकार, नवी दिल्ली) यांचा भव्य सत्कार सन्मान सोहळा मराठी पत्रकार संघ मुंबई या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता, सदर कार्यक्रमात के रवी दादा यांनी आपले शुभेच्छा पर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की मा. रामराव वडकुते हे सामाजिक बांधिलकी जपणारे, जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारे आणि विकासाभिमुख दृष्टी असलेले नेतृत्व म्हणून ओळखले जातात. ग्रामीण विकास, शिक्षण, सामाजिक समन्वय आणि जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले कार्य प्रेरणादायी आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत देशाच्या सर्वोच्च संसदीय सभागृहात, राज्यसभेत त्यांची निवड होणे हा महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण आहे. त्यांच्या या कार्याचा प्रथम गौरव करण्यासाठी इंडिया मीडिया लिंक अँड इव्हेंट्स मॅनेजमेंट, यांच्यावतीने करण्यात आला.

# पात्र झोपडपट्टी धारकांचा लवकरात लवकर सर्वे करा..!

नवी मुंबई/ के. एच. हनवते :-



दि.१०/०३/२०२६ रोजी घर हक्क संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने मा. सुजाता ताई पाटील (महापौर, नवी मुंबई महानगरपालिका नवी मुंबई) यांची भेट घेऊन नवी मुंबई महानगरपालिकेने पूर्वी ४७ झोपडपट्टी यांचा सर्वे करून त्यांना पात्र झोपडपट्टी धारक ठरविले आहे. त्यामध्ये काही चाळी आणि झोपडपट्टी यांची वाढ झालेली आहे, महाराष्ट्र शासनाच्या १६ मे २०१८ च्या शासन निर्णयानुसार (०१/०१/२०११) पात्र झोपडपट्टी धारक व चाळीधारक यांचा सर्वे करण्यात यावा. आणि त्यांना प्रोटेक्टेड सलग म्हणजे संरक्षित वस्ती, झोपडी म्हणून जाहीर करण्यात यावे याबाबत व बऱ्याच वस्त्यांमध्ये पिण्याचे पाणी व शौचालय, घरपट्टी असे अनेक समस्या मांडण्यात आल्या व हे प्रश्न महासभेमध्ये, स्थायी समितीमध्ये घ्यावे, व नवी मुंबई महानगरपालिका, सिडको, एम आय डी सी यांनी याविषयी एकत्रित निर्णय घेऊन यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी मांडणी केली त्यावेळी कैलाश सरकटे ( अध्यक्ष, घर हक्क संघर्ष समिती ), सुनंदाताई बाविस्कर ( महिला उपाध्यक्ष, घर हक्क संघर्ष समिती ), कोंडीबा हिंगोले ( मुख्य संघटक, घर हक्क संघर्ष समिती ), उल्हास नेरुरकर ( मुख्य संघटक, घर हक्क संघर्ष समिती ), सुकन्या जाधव ( युवा संस्था ), राहुल लोखंडे ( खजिनदार, द मुकनायक ट्रस्ट), रविंद्र शिंदे ( तळवली), गोविंद वेताळ ( चर्मकार समाज समाजसेवक ), पोपट पुकळे ( तळवली), दिगंबर काळे ( पनवेल) हजर होते वरील विषयी विस्तृत चर्चा करण्यात आली.

# आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

केज/प्रतिनिधी.-बोरगाव (बु) : काल स्व. रेखा भगवान गोदाम यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे जेष्ठ चिरंजीव धनंजय गोदाम व सून सोनल गोदाम या दांपत्याने जि.प. शाळा बोरगाव (बु)



येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करून आईच्या स्मृतींना अभिवादन केले.स्व. रेखा गोदाम यांनी प्राथमिक शिक्षण याच शाळेत घेतले होते. त्यांच्या स्मरणार्थ गेल्या चार वर्षांपासून धनंजय व सोनल गोदाम हे दांपत्य मुंबई-खारघर येथून दरवर्षी हा स्तुत्य उपक्रम राबवत आहेत. त्यांच्या या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या आदर्श उपक्रमाबद्दल शाळेचे शिक्षक, ग्रामस्थ तसेच नातेवाईकांनी गोदाम दांपत्याचे कौतुक केले.यावेळी बन्सी अप्पा आरकडे, संग्राम आरकडे, विजय आरकडे, भैय्यासाहेब आरकडे, प्रभावती आरकडे, मनिषा आरकडे, स्मिता आरकडे, जयश्री गायकवाड, सरिता आरकडे, जया आरकडे, शाळेचे मुख्याध्यापक श्री. देशमुख आर. के. सह शि. यादव बी. एन. जोशी व्ही. बी. सागरे एस. पी. पोपळघट पी. व्ही. कुदळे मॅडम, देखणे मॅडम उपस्थित होते.

# रेल्वे पुलासह उर्वरित रस्त्यासाठी २०५ कोटीचा निधी मंजूर; लातूर मुरुड येडशी रस्त्याचे संपूर्ण चौपदरीकरण होणार



लातूर२ :- लातूर मुरुड येडशी दरम्यानच्या रस्त्याचे एक बाजूचे काम प्रगतीपथावर असून केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी यांनी या रस्त्याच्या दुसऱ्या बाजूसह लातूर शहरानजीक रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाला मंजुरी देऊन २०५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. नव्याने रस्त्याच्या उर्वरित कामाला मंजुरी मिळाल्याने लातूर ते येडशी पर्यंत संपूर्ण रस्त्याचे चौपदरीकरण होणार असल्याची माहिती लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी दिली.





लातूर येथून मुंबई पुण्याकडे जाणाऱ्या नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेल्या लातूर टेंभुर्णी या रस्त्याचे काम तातडीने करण्यात यावे यासाठी केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी यांच्याकडे भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे या रस्त्याचे काम केंद्रीय रस्ते व वाहतूक विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. लातूर पासून सुरू झालेले रस्त्याचे काम एक बाजूने जवळपास पूर्णत्वाकडे आले असून त्यातील बोरगाव काळे ते जावळे फाट्या दरम्यानचे रस्त्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

रस्त्यावरून होणारी वाहतूक लक्षात घेता लातूर ते येडशी या रस्त्याचे चौपदरीकरण करणे अत्यंत गरजेचे असल्याने मागील काळात आ. रमेशअप्पा कराड यांनी केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांना प्रत्यक्ष भेटून रस्त्याचे काम चौपदरीकरण करावे अशी आग्रहाची मागणी केली होती.

केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनी लातूर येडशी दरम्यानच्या रस्त्याची गरज लक्षात घेऊन ज्या ठिकाणी एक बाजूने काम झाले आहे अशा ठिकाणी दुसऱ्या बाजूचे जवळपास १६ किलोमीटर काम करण्यासाठी आणि लातूर शहरानजीक हरंगुळ परिसरातील रेल्वे मार्गावर दुसरा नव्याने उड्डाणपूल उभारणी करिता मान्यता देऊन २०५ कोटी रुपयाचा निधी चालू मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात मंजूर केला आहे.

केंद्रीय रस्ते व वाहतूक विभागाने नव्याने मंजूर केलेल्या २०५ कोटी रुपयांतून बोरगाव काळे ते मुरुड अकोला दरम्यान ११ किलोमीटर, येडशी ते जावळे फाटा २ किलोमीटर आणि येडशी गावाच्या बाहेरून रिंग रोड करिता २ किलोमीटर त्याचबरोबर हरंगुळ परिसरातील रेल्वे लाईनवर नवीन स्वतंत्र दुसरा उड्डाणपूल व पोच मार्ग करण्यात येणार आहे. नव्याने मंजूरी मिळालेल्या रस्त्याच्या ठिकठिकाणीच्या कामाकरिता जवळपास आठ हेक्टर जमीन भूसंपादन होणार असल्याची माहिती देऊन भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, नव्याने मंजूर झालेल्या कामाची लवकरच निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर लातूर ते येडशी हा संपूर्ण रस्ता चौपदरीकरणाने होईल. सदर कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांचे भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी आभार व्यक्त केले आहेत.

# व्यापारी महासंघाच्या वतीने केज पोलीस ठाण्याला दिलेल्या वॉटर फिल्टरचे लोकार्पण

केज/प्रतिनिधी-आपल्या समाजउपयोगी उपक्रमांनी सतत क्रियाशील असलेल्या केज येथील व्यापारी महासंघाच्या वतीने केज पोलीस ठाण्याला वॉटर फिल्टर विथ कुलिंग सिस्टम भेट देण्यात आले होते त्याच्या लोकार्पणाचा छोटेखानी कार्यक्रम काल दिनांक १२ मार्च २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.




केज पोलीस ठाणे येथे वेगवेगळ्या कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची पिण्याच्या पाण्यासाठी होणारी अडचण लक्षात घेत व्यापारी संघाच्या वतीने केज पोलीस ठाण्याला वॉटर फिल्टर विथ कुलिंग सिस्टम देण्याची ईच्छा केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्याकडे व्यक्त केली असता. पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांनी सकारात्मकता दर्शवली होती.त्यानुसार केज पोलीस ठाण्याच्या आवारात फिल्टर व कुलिंग मशीन बसवण्यात आले व फीत कापुन व श्रीफळ फोडून त्याचे लोकार्पण देखील लागलीच करण्यात आले.

व्यापारी महासंघाच्या वतीने पोलीस ठाण्यात बसवण्यात आलेल्या वॉटर फिल्टर मुळे सर्वसामान्यांची पिण्याच्या पाण्याची सोय होण्यास मदत होणार असल्यामुळे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी व्यापारी बांधवांचे आभार व्यक्त करत कृतज्ञता व्यक्त केली.

तर केजमधील व्यापारी बांधव नेहमीच सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न नेहमीच करत आला असुन गरजेनुसार असेच उपक्रम भविष्यात राबविण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहु अशी ग्वाही यावेळी महासंघाच्या वतीने दिली आहे.

यावेळी पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमेर, पोलीस उपनिरीक्षक रोडे, इनामदार, प्रा.हनुमंत भोसले , विकास अप्पा मिरगणे , पांडुरंग मिटकरी , सुहास चिद्रवार , निरंजन लोकरे , भूषण भन्साळी , गोविंद कणसे , सुरेश थोरात , गोविंद जाजू , नितीन काळे , प्रकाश जाडकर , रणजित निंगुळे , आदित्य मिटकरी , मयूर मंडलेचा यांच्यासह पोलीस कर्मचारी सिद्दिकी शहा, बाळासाहेब अहंकारे, त्रिंबक सोपणे, शिवाजी कागदे, सुमित माळी, शिंदे, श्रीमती पूजा माके, श्रीमती अनिता दगडखैर, श्रीमती राधा चव्हाण, श्रीमती संगीता हनवते, होमगार्ड सुनील कुलकर्णी, निखिल काळे, सामाजिक कार्यकर्ते अशोक गायकवाड यांच्यासह पत्रकार बांधव व पोलीस कर्मचारी आणि व्यापारी बांधव यांची उपस्थिती होती.

# शासकीय योजनांच्या लाभासाठी दिव्यांग सहाय्यक पोर्टलवर नोंदणी करावी

लातूर : महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण विभागातंर्गत दिव्यांग बांधवांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. यात दिव्यांगांची हेळसांड होवू नये व घरबसल्यास योजनेचा लाभ घेणे सोईचे होईल, यादृष्टीकोनातून मुंबई दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्या संकल्पनेतून राज्य शासनाच्यावतीने दिव्यांग सहाय्यक पोर्टल निर्मिती करण्यात आली आहे. या पोर्टलवर जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी ऑनलाईन नोंदणी करुन शासकीय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन लातूर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांनी केले आहे.

केंद्र व राज्य शासनामार्फत दिव्यांग बांधवांना सक्षम बनविण्यासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनेचा लाभ दिव्यांगांना सुलभ होण्याच्या दृष्टीने या पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. दिव्यांग बांधवांच्या विविध योजना यात असून विविध विभागातील माहिती यात दर्शविण्यात आली आहे. एकाच छताखाली दिव्यांग बांधवांच्या विविध योजना यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत, यात शासकीय योजनासह सेवा व लाभ यातून मिळणार आहेत. दिव्यांग विद्यार्थी शिष्यवृत्ती, साधने व उपकरणे, स्वंयरोजगारासाठी साधन सामुग्री, अर्थसहाय्य, गुणवत्ता पुरस्कार, सामाजिक सुरक्षा अंतर्गत विवाह प्रोत्साहन अनुदान, विविध शाळा व महाविद्यालयातील प्रवेश, रुग्णालयातील उपचार यासह अनेक योजनांचा या पोर्टलवर समावेश करण्यात आला आहे.

दिव्यांग बांधवांनी https://divyangsahayakportal.maharashtra.gov.in या संकेस्थळावर ऑनलाईन नोंदणी करतांना युआयडी क्रमांक टाकून नोंदणी करावी व विविध योजनांचा लाभ घ्यावा असे कळविले आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.